विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमध्ये सुधारणा.

**महाराष्ट्र शासन**

**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग**

**शासन निर्णय क्र. गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/ विजाभज-१**

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक :- २४ जानेवारी, २०१८

**वाचा:-** १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.गृनियो-२०११/प्र.क्र.१११/विजाभज-१, दि.२७.१२.२०११.

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.गृनियो-२०११/प्र.क्र.१११/विजाभज-१, दि.३०.०१.२०१३.

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.गृनियो-२०११/प्र.क्र. १११/विजाभज-१, दि.१२.०८.२०१४.

**प्रस्तावना :-**

देशाच्या स्वातंत्र्यानंतर बरीच वर्षे उलटूनही विमुक्त जाती व भटक्या जमातीचा समाज अद्यापही समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकलेला नाही. या समाजास विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे गरजेचे होते. भटक्या विमुक्त समाजाचे राहणीमान उंचावे, त्यांचे उत्पन्नस्त्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी म्हणून त्यांना जमीन उपलब्ध करुन तेथे वसाहत उभी करुन देणे व त्याठिकाणी त्यांना आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण बनविणे आवश्यक होते. त्यामुळे विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु सदरहू योजनेतील काही बाबींमुळे सदर योजना यशस्वी होऊ शकली नाही. ही बाब विचारात घेऊन सदर योजनेत काही सुधारणा करुन विजाभज समाजास सदरहू योजनेचा लाभ जास्तीत जास्त देण्याकरिता व त्यास विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदर योजनेचा मूळ योजनेत सुधारणा करुन सदर योजना राज्य शासनाच्या रमाई आवास योनजेच्या धर्तीवर अथवा पंतप्रधान आवास योनजेच्या धर्तीवर राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

सदरहू योजनेबाबत यापूर्वी संदर्भ क्र. १, २ व ३ अनुसार अनुक्रमे दि.२७.१२.२०११, दि.३०.०१.२०१३ व दि.१२.०८.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहेत. तसेच विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी, त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात येता यावे यासाठी ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील घटकांसाठी राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुधारीत करुन सदरहू योजना राज्यात नव्याने राबविण्याकरिता त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

१) एकूण २० कुटूंबांसाठी पूर्वीप्रमाणे एक हेक्टर जमीन उपलब्ध होत नसल्यास तेथील स्थानिक परिस्थितीनुसार जमीनीची अट शिथील करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीस असतील.

२) एकूण १० पात्र लाभार्थी कुटूंबांसाठी जमीन उपलब्ध होत असल्यास त्यांना सदरहू योजनेचा लाभ देण्यात येईल.

३) सदर योजनेचा निधी रमाई आवास योजनेच्या धर्तीवर सदर योजनेच्या वैयक्तीक लाभार्थ्यांना राज्य व्यवस्थापनाच्या ग्रामीण गृहनिर्माण कक्षामार्फत थेट उपलब्ध करुन देण्यात यावा.

४) सदर योजनेला रमाई आवास योजनेच्या धर्तीवर वैयक्तीक लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात यावे, तसेच रमाई आवास योजनेचे सर्व निकष व अटी-शर्ती सदरहू लाभार्थ्यांना लागू राहतील आणि या संदर्भातील निधीचे वतिरण जिल्हा ग्रामीण विकास प्राधीकरण (DRDA) यांचे मार्फत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल.

५) सदर योजनेचा लाभ ग्रामीण भागात देण्यात यावा.

६) त्याचप्रमाणे सदर योजनेचा लाभ विजाभज प्रवर्गाच्या वैयक्तीक कुटूंबांना सुध्दा देण्यात यावा.

७) ज्या लाभार्थ्यांकडे स्तत:ची जागा आहे आणि आजपर्यंत त्याने केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही आवास योजनेचा लाभ घेतला नाही, त्यास सदर योजनेचा लाभ देता येईल.

८) ग्रामीण भागात पुरेशी जागा उपलब्ध होत असल्यास सामुहिकरित्या आणि जागा उपलब्ध होत नसल्यास वैयक्तीकरित्या सदर योजना राबविण्यात यावी.

९) ग्रामीण भागातील प्रत्येक जिल्हयात सदरहू समाजाच्या लाभार्थ्यांना सामुहिकरित्या अथवा वैयक्तीकरित्या सदरहू योजनेचा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

१०) महानगर पालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रात ही योजना लागू राहणार नाही.

२. सदरहू योजनेंतर्गत शासकीय जमीन उपलब्ध होत असल्यास किमान १० कुटूंबासाठी सामुहिक योजना राबवून त्यामध्ये रमाई आवास योजनेच्या धर्तीवर प्रतिलाभार्थी घर बांधण्यास आणि सदरहू वसाहतीला पाणी पुरवठा, वीज पुरवठा, सेफ्टीक टँक, गटारासह अंतर्गत रस्ते इत्यादी नागरी सेवा पुरविण्यासाठी प्रती वसाहत रु.४४.३१ लक्ष इतका आणि पुढील पात्र १० कुटूंबासाठी त्याप्रमाणात लाभार्थीनिहाय निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. या योजनेचा निधी संचालकांनी संबंधित विभागास वितरीत करण्याची कार्यवाही करावी. सदर योजनेच्या अंमलबजावणीचे नियंत्रण अधिकारी म्हणून संबंधित विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग हे राहतील. सदरहू योजनेसाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करुन दिल्यानंतर याबाबतचा खर्च करण्यात यावा.

४. उक्त योजनेची अंमलबजावणी तसेच नियम व अटी सोबत जोडलेल्या “परिशिष्ट-अ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील. सदरहू योजनेच्या सामुहिक वसाहतीअंतर्गत खर्च करावयाचा निधी हा संबंधित बांधकाम यंत्रणेस वितरीत करण्यात येईल. तसेच वैयक्तिक लाभार्थी योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या घराच्या बांधकामासंदर्भातील निधी जिल्हा ग्रामीण विकास प्राधीकरण (DRDA) यांचे मार्फत सार्वजनिक वित्तीय व्यवस्था प्रणालीव्दारे (Public Financial Management System - PFMS) थेट लाभार्थी वितरण पध्दतीने (Direct Beneficiary Transfer - DBT) संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बांधकामाच्या टप्प्यानुसार टप्प्या-टप्प्याने थेट जमा करण्यात येईल. त्याकरिता संबंधित लाभार्थ्यांचे बँकखाते हे आधारकार्ड संलंग्नित असणे

बंधनकारक राहील. त्याशिवाय सदरहू निधी संबंधित लाभार्थ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा केला जाणार नाही.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २२१/व्यय-१४/२०१७, दि. १५.११.२०१७ अन्वये दि. ११.०१.२०१८ रोजी दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२४१२५१३४३१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.01.29 17:51:09 +05'30'

**(भा. र. गावित)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१) मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४) मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५) मा. मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहाय्यक.
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई. (प्रसिध्दीसाठी)
८) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे.
९) सर्व मंत्रालयीन विभाग
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१३) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई.
१४) सर्व उपविभागीय अधिकारी
१५) सर्व तहसिलदार
१६) सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
१७) सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
१८) सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१९) महालेखापाल (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र१/२ मुंबई/नागपूर
२०) सर्व कार्यासन अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (विजाभज-१)

**शासन निर्णय क्र. गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/ विजाभज-१, दि. २४.०१.२०१८ चे सहपत्र**

**परिशिष्ट "अ"**

| | |
|---|---|
| **पात्रता निकष** | १) लाभार्थी कूटूंब हे विमुक्त जाती, भटक्या जमाती या मूळ प्रवर्गातील तसेच गावोगावी भटक्ंती करुन उपजिवीका करणारे असावे.<br>२) लाभार्थी कूटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लाख पेक्षा कमी असावे.<br>३) लाभार्थी कूटूंबाचे स्वत:चे मालकीचे घर नासावे<br>४) लाभार्थी कूटूंब हे झोपडी/कच्चे घर/ पालामध्ये राहणारे असावे.<br>५) लाभार्थी कूटूंब हे भूमिहीन असावे<br>६) लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.<br>७) लाभार्थी कूटूंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>८) सदरहू योजनेचा लाभ पात्र कुटूंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.<br>९) लाभार्थी वर्षभरात ६ महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा. |
| **प्राधान्य क्रम** | या योजनेसाठी विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील कुटूंबाना खालील प्रमाणे प्राधान्य क्रम देण्यात येईल.<br>१) पालात राहणारे (गावोगावी भटक्ंती करुन उपजिवीका करणारा)<br>२) दारिद्रय रेषेखालील कुटूंब.<br>३) घरात कोणही कमावत नाही अशा विधवा, परितक्त्या किंवा अपंग महिला<br>४) पूरग्रस्त क्षेत्र. |
| **अटी व शर्ती** | १) या योजनेंतर्गत लाभार्थी कुटूंबाना मिळणारा भूखंड व त्यावरील घर हे संयुक्तपणे पती व पत्नीच्या नावे केले जाईल. मात्र विधवा व परितक्त्या स्त्रियांच्या बाबतीत भूखंड व त्यावरील घर त्यांच्या नावेच केले जातील.<br>२) या योजनेंतर्गत मिळालेला भूखंड व त्यावरील घर लाभार्थी कुटूंबास कोणत्याही कारणास्तव कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच भूखंड व घर कोणत्याही परिस्थितीत विकता येणार नाही.<br>३) या योजनेचा लाभ कुटूंबातील एकाच कायदेशिर व्यक्तीस देण्यात येईल.<br>४) भूखंडावरील जागेचा वापर हा भाडे तत्वावर अन्य व्यक्ती/कुटूंबास देता येणार नाही. तसेच पोट भाडेकरु सुध्दा ठेवता येणार नाही, तसेच विकता येणार नाही. तसे आढळून आल्यास सदरचा लाभ रद्द करण्यात येईल व मंजूर केलेल्या निधीची वसूली केली जाईल.<br>५) प्रस्तुत घराचे बांधकाम झाल्यानंतर ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणारी वार्षिक घरपट्टी व पाणीपट्टी लाभार्थ्यांने भरणे आवश्यक राहील व घराचे देखभाल व दुरुस्ती ही लाभार्थ्यांने स्वत: करावयाची आहे. |
| **जिल्हास्तरीय समिती** | सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती असेल.<br>१) जिल्हाधिकारी- अध्यक्ष |

| | |
|---|---|
| | २) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद- सदस्य<br>३) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा- सदस्य<br>४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी - सदस्य<br>५) सहाय्यक संचालक, नगर रचना- सदस्य<br>६) जिल्हा पशु संवर्धन अधिकारी- सदस्य<br>७) व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र- सदस्य<br>८) जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक वित्त व विकास महामंडळ- सदस्य<br>९) जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला विजाभज प्रवर्गासाठी कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता.<br>१०) प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग/ प्रादेशिक उपसंचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>११) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण अधिकारी व सहायक संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनाल - सदस्य सचिव<br><br>**सदरहू जिल्हास्तरीय समितीचे कार्य हे पुढीलप्रमाणे राहील:-**<br>१) सदरहू योजनेकरीता शासकीय जमिनीची निवड करणे.<br>२) शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास खाजगी जमिनीचे दर निश्चित करणे व ती खरेदी करणे.<br>३) पात्र लाभार्थी कुटूंबाची निवड करणे. पात्र लाभार्थ्यांला किंवा त्यांच्या कुटूंबातील सदस्याला शासनाच्या अन्य योजनेमधून यापूर्वी घरकूल मिळालेले नाही याची खात्री करणे.<br>४) उपलब्ध शासकीय/खाजगी जमिनीचा ले-आऊट करुन प्रत्येक लाभार्थी कुटूंबासाठी घर बांधून देणे. ले-आऊट करत असताना रस्ते, गटारे, समाज मंदीर, शाळा/अंगणवाडी (शक्य असेल तेथे) खुली जागा इत्यादी साठी जागा राखून ठेवण्यात यावी.<br>५) लाभार्थ्यांकडून घरकुलांचे बांधकाम तसेच वसाहती अंतर्गत पायाभूत सुविधा याबाबतची कामे वेळेत पूर्ण करुन घेणे.<br>६) भूखंडाचे व घरकुलांचे पात्र लाभार्थी कुटूंबांना वाटप करणे.<br>७) सदरहू लाभार्थी कुटूंबांना विविध शासकीय योजनेद्वारे स्वयंरोजगार निर्मितीची संधी उपलब्ध करुन देणे.<br>८) वसाहतींचे प्रकल्प अहवाल, नकाशे व अंदाजपत्रके याबाबतचा अहवाल संचालक, विजाभज यांचेमार्फत शासनास मंजूरीसाठी सादर करणे. तथापि, फक्त घर बांधकामासंदर्भातील वैयक्तीक लाभार्थींची प्रकरणे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस असतील. |
| **तालूका स्तरीय समिती व** | या योजनेसाठी सुयोग्य शासकीय जमिनीची जिल्हास्तरीय समितीस कार्यान्वयन समिती शिफारस करण्यासाठी आणि शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास जिल्हास्तरीय समितीस जमिन खरेदी करुन लाभार्थ्यांना वितरण करणे या प्रक्रियेमध्ये सहाय्य करणेसाठी संबंधित तालूक्याचे उपविभागीय अधिकारी |

<table>
<tr><td>लाभार्थ्यांची निवड</td><td>(महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली तालूका स्तरावर खालीलप्रमाणे तालुकास्तरीय कार्यान्वयन समिती असेल. सदरहू समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय समितीकडे सादर करण्यात यावा.
<table>
<tr><td>१) उपविभागीय अधिकारी</td><td>समिती प्रमुख</td></tr>
<tr><td>२) तहसिलदार</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण/ सहाय्यक संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५) गटविकास अधिकारी, पंचायत समिती</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६) तालूका निरिक्षक भूमी अभिलेख</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>७) म.रा.विद्युत वितरण कंपनीचा प्रतिनिधी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>८) तालूका कृषि अधिकारी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>९) सबंधित मंडळ अधिकारी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>१०) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण/ विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे कार्यालयातील समाज कल्याण निरीक्षक</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>जमिन उपलब्ध करण्याची कार्यपध्दत</td><td>जिल्हयात ग्रामीण भागामध्ये ज्या ठिकाणी विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील बेघर व भूमीहीन कुटूंबाची संख्या जास्त आहे अशा ठिकाणांचाशोध घेवून त्यानुसार शासकीय जमिन उपलब्ध करुन घ्यावी. शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास खाजगी जमिनीची खरेदी करण्यात यावी. जमीन खरेदी करताना सदरहू जमीनीवर उभारण्यात येणाऱ्या वसाहसतीस आवश्यक तो निवासी पाणी पुरवठा वर्षभर होऊ शकेल का, याबाबत खात्री करुनच जमीन खरेदी करावी. त्याबाबतचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील. खाजगी जमीन उपलब्ध करण्यासाठी संबंधित भागात मागील ५ वर्षाचे खरेदी विक्री व्यवहार व प्रचलित शिघ्र सिध्दगणकांचे दर विचारात घेवून जमिन उपलब्ध करण्यात यावी. त्या दराने जमिन विक्रीस जमीन मालक तयार नसला तर उपलब्ध दरापैकी जो दर जास्त असेल त्यावर २० टक्के पर्यंतइतकी वाढ करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस असतील.</td></tr>
<tr><td>लाभार्थ्यांने सादर करावयाची कागदपत्रे</td><td>१) सक्षम प्राधिकाऱ्योने दिलेले जात प्रमाणपत्र.<br>२) कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लक्ष पेक्षा कमी असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र<br>३) भूमिहीन असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र.<br>४) महाराष्ट्र राज्यातील वास्तव्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र<br>५) कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीने महाराष्ट्र राज्यात इतर कोणत्याही ठिकाणी घरकुल योजनेचा लाभ घेतला नसल्याबद्दलचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **भूखंड व त्यावरील घराचे क्षेत्रपळ व किंमत** | सदरहू योजना ही ग्रामीण भागात राबविण्यात येणार असून प्रत्येक लाभार्थी कुटूबास शासनाने अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने उपलब्ध करुन दिलेल्या भूखंडावर रमाई आवास योजनेच्या निकषानुसार घर बांधून देण्यात येईल अथवा संबंधित लाभार्थ्यांची स्वत: ची जागा असेल तर त्या जागेवर लाभार्थ्यांस घराचे बांधकाम करता येईल. घराचा आराखडा हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी राबविण्यात येत असलेल्या रमाई घरकुल योजनेतील घराच्या आराखडयाप्रमाणेच राहील. |
| **सर्वेक्षण करणे** | सदरहू योजनेसाठी पात्र लाभार्थी कुटूंबाच्या सर्वेक्षणाचे काम हे तलाठी व ग्रामसेवक यांच्याकडून करुन घेण्यात यावे. सर्वेक्षण करणे, वसाहत प्रकल्पाचा अहवाल तयार करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे इ. बाबीसाठी प्रशासकीय खर्च म्हणून ५ टक्के रक्कम या योजनेसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीमधून प्रथमत: राखून ठेवण्यात यावी व उर्वरीत निधीमधून निवड झालेल्या लाभार्थ्यांची प्रकरणे तयार करावीत. |
| **वसाहतीचा प्रकल्प अहवाल बांधकाम तसेच पायाभूत सुविधा** | सदरहू योजनेंतर्गत घराचे बांधकाम करणे तसेच वसाहतीमध्ये पायाभूत सुविधा उदा. पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, अंतर्गत रस्ते, गटारे, समाज मंदीर इत्यादी सर्व बाबी विचारात घेवून प्रत्येक वसाहतीचा प्रकल्प आराखडा, नकाशा व अंदाजपत्रके तयार करणे तसेच नागरी सुविधाची ही कामे पूर्ण करुन देण्याचे काम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून करुन घेण्यात यावे. सदरहू योजनेंतर्गत घराचे बांधकाम करणे तसेच वसाहतीमध्ये घराचे बांधकाम शक्यतो लाभार्थ्यांमार्फतच करावे. त्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जिल्हा विकास यंत्रणेमार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बांधकामाच्या प्रगतीनुसार तीन टप्प्यात अदा करण्यात यावी. लाभार्थीने घरकुलाचे बांधकाम करण्यास असमर्थता दर्शविल्यास काही अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत जिल्हाधिकारी यांनी निवड केलेल्या बांधकाम व्यवसायातील नामांकित संस्था/स्वयंसेवी संस्थामार्फत घराचे बांधकाम करण्यास हरकत नसावी. तथापि, अशा संस्थांची निवड शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल. |
| **स्वयंरोजगार निर्मिती** | वसाहती मधील लाभार्थी कुटूंबांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून पशुसंवर्धन, कृषी, जिल्हा उद्योग केंद्र, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांद्वारे संधी उपलब्ध करुन देण्यात यावी. शक्य असेल तेथे बचत गटाची स्थापना करुन त्याद्वारे देखील लाभार्थी कुटूंबांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात यावी. रोजगाराच्या योजना राबवितांना त्या त्या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी राहील. सदरहू कामासाठी निधी त्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीत तरतूदीमधुन तसेच संबंधित विभागांच्या मंजूर योजनेमधून वापरावा. |

*********************